# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

## वैद्यकिय विभाग

## सभावृत्तांत

दिनांक – २५/१०/२०१८

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांची विविध विषयांवर चर्चा करणेकामी आढावा बैठक दि. २५/१०/२०१८ रोजी स. ११.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीकरिता खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री. श्रावण हर्डीकर, आयुक्त तथा अध्यक्ष
२. श्री. बबनराव झिंझुर्डे अध्यक्ष, पि.चि. मनपा कर्मचारी महासंघ
३. डॉ. के. अनिल रॉय, आरोग्य वैद्यकिय अधिकारी तथा कार्याध्यक्ष
४. श्री.मनोज माछरे , मुख्य प्रवक्ता पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघ
५. श्री. आमोद कुंभोजकर मुख्य लेखा परिक्षक, तथा सदस्य
६. श्री. जितेंद्र कोळंबे , मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. प्रमोद जगताप, कामगार कल्याण अधिकारी
८. श्री. एम.के कोळप, कायदा अधिकारी
९ .श्रीम. रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी

सदर बैठकीमध्ये विषय पत्रिकेत नमूद करण्यात आलेल्या मुद्यांचे अनुषंगाने चर्चा करण्यात आलेली असून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. हॉस्पिटलकडून करणेत येणारी सर्जरी व इतर दर निश्चित केले आहे. याबाबत जे दरपत्रक निश्चित केलेले आहेत त्यावर मनपा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व सक्षम अधिका-यांची स्वाक्षरी घेणेत आलेली आहे. सदरचे विषयपत्रात नमूद केलेले अनु. क्र.१ ते ७ चे दर मान्य करणेत आले असून ते दर धन्वंतरी योजनेच्या दरपत्रकांमध्ये समाविष्ट करणेत येत आहे.

२. धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत वैद्यकीय उपचारांचा बिलांचा तपशील मा. मुख्यलेखापाल व मा. मुख्यलेखापरिक्षक यांचेकडून तपासून देऊन सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे. मा. आयुक्त सो. यांचे सुचनेनुसार पुढील धन्वंतरी स्वास्थ्य योजनेच्या सभेपुर्वी उपरोक्त अधिका-यांना खर्चाचा तपशिल देणेत येईल.

३. मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाचा तपशील दिला असता त्यामध्ये र.रु १.३ कोटी इतकी तरतुद शिल्लक असून रुग्णालयांना दयावायची र.रु. ६.२३ कोटी इतक्या रक्कमेची बिले प्रलंबित असलेबाबत मा. आयुक्त सो. यांचे निदर्शनास आणून दिले असता, मा. आयुक्त सो. यांनी मा. मुख्यलेखापाल यांना धन्वंतरी योजनेस वाढीव तरतूद देणेबाबत सूचना केल्या आहेत.

४. धन्वंतरी योजनेअंतर्गत पॅनेलवरील हॉस्पिटला अल्काहोलीक रेफरचिट दिल्यामुळे सदर पॅनेलवरील अल्कोहोल प्राशन केल्यामुळे झालेले आजार, इजा, मारामारीमुळे झालेली इजा हॉस्पिटलनी संबंधित कर्मचा-यांचे उपचार

करुन तशी बिले हॉस्पिटलने वैद्यकीय विभागास सादर केलेली आहेत. दाखला होताना सदरच्या रेफरचीटं पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयीन वेळेनंतर करार पध्दतीने नेमलेल्या वैद्यकीय अधिका-यांनी दिलेले असल्याने त्याबाबत जबाबदारी निश्चीत करणे शक्य नसल्याने संबंधित रुग्णालयांना सदरची बिले अदा करुन, मंजूर बिलांची रक्कम संबधित कर्मचा-यांकडून त्यांच्या पगारातून समान हस्यात वसूल करणेत यावी. सदर कर्मचा-यांची नावे पुढीलप्रमाणे -

१. विकास चंदनशिवे -

२. विशाल भास्कर कांबळे -

३. संतोष गुलाब गायकवाड -

४. राजू श्रावण सपकाळ -

५. सुनिल शिंदे -

धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत वैदयकीय बिलांची प्रतिपुर्तीबाबत :-

१. श्रीम. इंदूबाई गायकवाड यांनी दि. २५/०७/२०१८ रोजी रुबी हॉल क्लिनिकचे बिल प्रतिपुर्तीसाठी सादर केले होते. परंतू श्रीम.गायकवाड यांनी उपचार घेतेवेळी धन्वंतरी धोरणातील मुद्दा क्र. १२ (अ) प्रमाणे ११६ तासांचे आत कळविलेले नसल्याने दि. २६/०९/२०१७ रोजी धन्वंतरी धोरणाप्रमाणे बिल नामंजूर केले होते. श्रीम. इंदुबाई गायकवाड यांनी दि.१६/०३/२०१८ रोजी त्यांचे वैद्यकीय उपचाराचे बील फेरसादर केले असून, त्यामध्ये त्यांनी बेशुध्द अवस्थेत असल्याने त्यांना कळविता आले नाही. व त्याचे वस्तीमधील नागरिकांनी त्यांना सहयाद्री हॉस्पिटल, बोपोडी येथे प्रथमोपचारासाठी दाखल केले होते. व त्यांच्या आजाराची सुविधा सहयाद्री हॉस्पिटल, बोपोडी येथे नसल्याने त्यांना रुग्णवाहिकेतून रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे उपचारांसाठी दाखल केले होते. वरील बाब विचारात घेता श्रीम. इंदुबाई गायकवाड यांचे वैद्यकिय उपचाराचे बील धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजूर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

२. श्रीम. मनाली प्रदीप राणे, मुख्य लिपीक यांनी रत्ना मेमोरियल हॉस्पीटल, पुणे येथे तातडीमध्ये उपचार घेऊन धन्वंतरी धोरणाप्रमाणे ११६ तासांच्या आत न कळविल्याने त्यांचे बील धोरणांतील तरतुदीप्रमाणे दि. ०१/०३/२०१८ रोजी नामंजुर केले होते. तथापि, श्रीम. मनाली राणे यांनी दि. १५/०६/२०१८ रोजी त्यांचे बील फेरसादर करुन त्यांनी करसंकलनमधील विभागीय कार्यालयामध्ये दुरध्वनी व लेखी स्वरुपात कळविले असल्याचे नमूद केले आहे. सहा. मंडलअधिकारी यांनी सादर केलेल्या पत्रास अनुसरुन व डॉ. सतिश कर्निक, रत्ना मेमोरियल हॉस्पिटल, पुणे यांचे वैद्यकीय दाखलेनुसार सदर शस्त्रक्रिया ही तातडीच्या स्वरुपाची असल्याने सदर बील धन्वंतरी धोरणाप्रमाणे व दरपत्रकाप्रमाणे मंजुर करणेत येत आहे. रुग्णालय धन्वंतरी योजनेअंतर्गत पॅनेलवर नाही. सदर कर्मचा-याने उपचार घेतेवेळी धन्वंतरी धोरणातील मुद्दा क्र.१२ (अ) प्रमाणे दि. ०१/०३/२०१८ रोजी धन्वंतरी धोरणाप्रमाणे बिल नामंजूर केले असून प्रकरण पुन्हा दि. १५/०६/२०१८ रोजी फेरसादर केले असून त्यामध्ये त्यांनी करसंकलन विभागात दूरध्वनीद्वारे व लेखी स्वरुपात कळविलेले असून सोबत जोडून आवक केलेल्या अर्जावर कोणाचीही स्वाक्षरी दिसून येत नाही. तसेच रुग्णालयातील डॉ. सतिश कर्निक यांनी दि. १७/११/२०१७ रोजी तातडीने पत्र जोडले आहे. तरी सदरचे बिल मंजूर करणेत येत आहे.

३. श्री. महेश पोपट अलकुंटे यांनी मुलाचे उपचार घेतेवेळी धन्वंतरी योजनेत मुलाचे नाव समाविष्ट केले नसल्याने दि. २८/०९/२०१८ रोजी त्यांचे वैद्यकीय प्रतिपुर्तीचे बील नांमजुर केले होते. तथापि, श्री.अलकुटे यांनी त्यांच्या बाळाचा जन्मदाखला घेऊन त्याचे नाव धन्वंतरी योजनेत समाविष्ट केले आहे. त्यामुळे श्री. अलकुंटे यांचे बाळाचे वैद्यकीय बीलाची प्रतीपुर्ती करणेस धन्वंतरी धोरणाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

४. श्री. नितीन गोंविदराव गुंडाळ यांनी त्यांचे पत्नीचे वैद्यकिय उपचार तातडीमध्ये पॅनेल बाहेरील रुग्णालयात घेतल्याने व धन्वंतरी धोरणाप्रमाणे ११६ तासांच्या कळविले नव्हते. सदर उपचाराची तातडी लक्षात घेता सदर वैद्यकीय बीलाची प्रतिपुर्ती धन्वंतरी धोरणाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

५. श्री. रघुनाथ दादासाहेब कुंभार, सहा. शिक्षक यांनी कै. यशंवतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाची रेफर चिट घेऊन दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे त्यांच्या मुलाला वैद्यकिय उपचारासाठी दाखल केलेले होते. श्री. कुंभार यांनी धन्वंतरी धोरणाप्रमाणे ११६ तासांच्या आत न कळविल्याने त्यांचे बील दि. २९/०६/२०१८ रोजी नामंजुर करणेत आले होते. तथापि, श्री. कुंभार यांनी दि. १२/०७/२०१८ रोजी त्यांना धोरणातील ११६ तासांच्या तरतुदीबाबत माहिती नसल्याने बील मंजुर करणेकामी विनंती केलेली आहे. सबब, रेफरचीट विचारात घेता तसेच आजाराचा विचार करता श्री. कुंभार यांचे मुलाचे वैद्यकीय उपचाराचे बील धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

६. श्री. प्रकाश बाबुराव ताकवले, मजुर यांनी त्यांचे पत्नीचे वैद्यकिय उपचार तातडीमध्ये पॅनेल बाहेरील रुग्णालयात घेऊन, धन्वंतरी धोरणाप्रमाणे ११६ तासांच्या कळविले नव्हते. तथापि, त्यांचे विभाग प्रमुखाने केलेली शिफारस व उपचाराची तातडी लक्षात घेऊन श्री. ताकवले यांचे पत्नीचे वैद्यकीय बीलाची प्रतिपुर्ती धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

७. श्री. रोहीदास सीताराम फुगे, मजुर यांनी स्वत:चे त्यांचे वैद्यकिय उपचार तातडीमध्ये पॅनेल बाहेरील रुग्णालयात घेऊन, धन्वंतरी धोरणाप्रमाणे ११६ तासांच्या कळविले नव्हते. तथापि, त्यांचे विभाग प्रमुखाने केलेली शिफारस व उपचाराची तातडी लक्षात घेऊन श्री. फुगे यांचे स्वत:चे वैद्यकीय बीलाची प्रतिपुर्ती धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

८. श्री. सदानंद भगवान ब्रम्हे यांनी दि. २०/१०/२०१८ रोजी अर्ज केला असून त्यामध्ये त्यांनी मुलाचे उपचारासाठी दर आठवडयाला इंजेक्शनची गरज असून, त्याची किंमत १२,६००/- इतकी असून प्रतिपुर्ती करणेबाबत अर्ज केला आहे. श्री. ब्रम्हे यांनी अर्जासोबत सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली दिसून येत नाही. याबाबत कागदपत्रांची पुर्तता करुन कै. यशंवतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचा अभिप्राय घेऊन प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

९. श्रीम. प्रगती राकेश कांबळे, मजुर यांनी त्यांचे बाळाचे उपचार धन्वंतरी योजने अतंर्गत पॅनेलवरील आदित्य बिर्ला हॉस्पिटल, येथे दि.१७/०९/२०१७ ते १८/०९/२०१७ अखेर घेतले आहे. तथापि, दि. १८/०९/२०१८ रोजी श्रीम. कांबळे आदित्य बिर्ला रुग्णालयातून दामा डिसचार्ज घेऊन सुर्या मदर ऍण्ड चाईल्ड केअर, वाकड या पॅनेल बाहेरील रुग्णालयात परस्पर बाळाला दाखल केले आहे. तसेच धन्वंतरी धोरणाप्रमाणे ११६ तासांच्या आत न कळविल्याने सदरचे बील दि.३१/०५/२०१८ रोजी नामंजुर करणेत आले होते. श्रीम. कांबळे यांनी सदरचे वैद्यकिय बील हे दि. २१/०६/०१८ रोजी फेरसादर केले आहे. श्रीम. कांबळे यांनी त्यांचे बाळाला स्वत:हून आदित्य बिर्ला रुग्णालयात दाखल केले होते. व परस्पर त्यांचे मर्जीनुसार पॅनेल बाहेरील रुग्णालयात दाखल करण्याचा निर्णय ही त्यांचा होता. सदरचे बील नामंजुर करणेत येत आहे.

१०. श्री. राजेश प्रकाश लोट, सफाई कामगार यांनी त्यांचे मुलीचे वैद्यकीय उपचार दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे येथे घेतले असून मुलीचे उपचाराचे वैद्यकीय बीलाची प्रतिपुर्ती धन्वंतरी धोरणातील दरपत्रकाप्रमाणे र.रु.६८,१२०/- इतकी मंजुर झालेली आहे. तथापि, मंजुर केलेली रक्कम कमी असल्याने श्री.लोट यांनी सदरची रक्कम वाढवून मिळणेकामी विनंती केलेली आहे. धन्वंतरी धोरणाप्रमाणे मंजुर रक्कम बरोबर असल्याने त्यामध्ये दुरुस्ती करणेत येणार नसल्याचे समितीने निर्णय घेतला आहे.

११. श्री. गोरोबा ब्रम्हा म्हेत्रे, सफाई सेवक यांनी त्यांचे स्वत:चे वैद्यकीय उपचार पॅनेल बाहेरील रुग्णालयात घेतले असून धन्वंतरी धोरणाप्रमाणे ११६ तासांच्या आत कळविलेले नाही. तसेच सादर केलेल्या डिसचार्जवरील आजाराचे अवलोकन केले असता सदर आजार परिशिष्ट ड मधील अ.क्र.५ नुसार असल्याने सदरचे बिल नामंजुर करणेस मान्यता देणेत आलेली आहे

१२. श्री. संजय सर्जेराव गायकवाड, शिपाई यांनी त्यांच्या मुलीचा ब्रेनचा एमआरआय करणेसाठी कै. यशंवतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातून डॉ. वाघ यांनी दिलेली रेफरचिट घेऊन पॅनेल बाहेरील रुग्णालयात एमआरआय केलेले आहे. डॉ. वाघ हे कै. यशंवतराव चव्हाण स्मृती मध्ये कार्यरत असल्याने त्यांनी दिलेल्या रेफर नुसार श्री. गायकवाड यांना त्यांच्या मुलीच्या वैद्यकीय उपचाराची प्रतिपुर्ती धन्वंतरी दरपत्रकाप्रमाणे करणेस मान्यता देणेत येत आहे. श्री.गायकवाड यांचे मुलीला Multiple Sclerosis हा आजार असून त्यांना दर महिन्याला मेडीसीनची गरज असून कै. यशंवतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातून याबाबतचा अहवाल घेऊन त्यानुसार बिलांची प्रतिपुर्ती केली जाते. तरी सदरचे मेडीसीनमध्ये बदल केला असून वैद्यकीय अधिकारी धन्वंतरी कक्ष यांनी औषधांचे रेफर व बिले तपासली असून त्यातील घटक पूर्वीच्याच औषधांप्रमाणे असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्यांना धन्वंतरी धोरणाप्रमाणे सदर औषधांची प्रतिपुर्ती करणेस मान्यता देणेत येत आहे

१३. श्री. राजु केशव कोपरे, लिपिक यांनी उपचारांबाबत धन्वंतरी धोरणांतील मुद्दा क्र.१२ (अ) प्रमाणे ११६ तासांचे आत कळविलेले नसल्याने सदरचे बिल दि.१२/०७/२०१८ रोजी नामंजुर करणेत आले होते. त्यांनी दि. २५/०७/२०१८ रोजी फेरसादर केले असून त्यांत त्यांनी श्री. मोरे कार्यकारी अभियंता यांना दुरध्वनीद्वारे तसेच ई- मेल केल्याचे नमूद केले आहे. श्री. कोपरे यांनी सादर केलेल्या बीलामध्ये सही व शिक्के नसल्याने चेन्नई येथील रुग्णालयातून ई – मेल द्वारे माहिती घेऊन बील मंजूर करणेस धन्वंतरी धोरणाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

१४. श्री. बाळासाहेब विष्णु तोंडे, रखवालदार यांनी वडीलांचे उपचार घेतेवेळी धन्वंतरी धोरणातील मुद्दा क्र. १२ (अ) प्रमाणे ११६ तासांचे आत कळविलेले नाही. त्यांचे दि. ०५/०७/२०१८ रोजीचे बिल नामंजुर करणेत आले होते. तथापि, श्री. तोंडे यांनी सदरचे बिल दि. १/१०/२०१८ रोजी फेरसादर केले आहे. तसेच त्यांचे स्वत:चे लग्न कार्य असल्याने व अर्जित रजेवर असल्याने व लग्नाची धावपळ व वडीलांची सुश्रुषा यामध्ये असल्याने त्यांना कार्यालयास कळविता आले नाही. असे नमूद केले आहे. श्री. तोंडे यांनी सादर केलेले बील व रुग्णालयाकडून मागविणेत आलेले आयपीडी पेपर्स तपासले असता त्यांच्या वडीलांची हाडांची शस्त्रक्रिया बी.ए.एम.एस (आर्युवेदीक) डॉ. कडून झाल्याचे दिसून येते. सबब, सदरचे बील नामंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

१५. श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग ताम्हाणे, वाहनचालक यांनी दि. ३०/०८/२०१८ रोजी सहयाद्री हॉस्पिटल, कर्वेरोड येथे दि. १७/०५/२०१६ ते दि. २२/०५/२०१६ रोजी दाखल होऊन त्यांची शस्त्रक्रिया करुन घेतलेली आहे. त्यांनी धन्वंतरी धोरणातील मुद्दा क्र. १२ (अ) प्रमाणे ११६ तासाचे आत कळविलेले नसल्याने धन्वंतरी धोरणाप्रमाणे त्यांचे बिल नामंजुर करणेत आले होते. तथापि, त्यांनी दि. १९/१०/२०१८ रोजी सदर वैद्यकिय उपचाराचे बील फेरसादर केलेले आहे. त्यांची झालेली शस्त्रक्रिया विचारात घेता समितीने त्यांच्या वैद्यकीय बीलाची प्रतिपुर्ती धन्वंतरी धोरणाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

१६. श्रीम. वंदना दिपक कुंभार यांनी त्यांचे पतीचे केईएम रुग्णालायातील उपचाराचे बील दि. १२/०३/२०१८ रोजीच्या धन्वंतरी समिती सभेत नामंजुर केले होते. श्रीम. कुंभार यांनी त्यांचे पतीस उपचारार्थ दाखल केले होते, त्यावेळी त्यांचे पतीचे नाव धन्वंतरी योजनेत अंतर्भूत करणेत आलेले नव्हते. तसेच त्यांनी धन्वंतरी धोरणातील मुद्दा क्र. १२ (अ) प्रमाणे ११६ तासाचे आत कळविलेले नसल्याने धन्वंतरी धोरणाप्रमाणे त्यांचे बिल नामंजुर करणेत आले होते. तरी श्रीम. कुंभार यांनी फेरमंजुरीकामी अर्ज दि. २३/१०/२०१८ रोजी मा. आयुक्त सो. यांचेकडे बील प्रतिपुर्तीसाठी अर्ज सादर केला होता. त्यावर मा. आयुक्त सो. यांनी तात्काळ नस्ती सादर करणेबाबत सूचना दिली होती. त्यानुसार धन्वंतरी समिती सभेत विषय घेऊन याबाबतची चर्चा करुन समितीने बील नामंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

५. शिक्षण मंडळ विभागातील सेवेतील व सेवानिवृत्त शिक्षकांना धन्वंतरी योजनेचा लाभ देणेबाबतच्या विषयासंदर्भात धन्वंतरी योजना लागु करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. तथापि त्वरित विमा योजना लागु करणेबाबत सूचना दिली आहे.

रेखा गाडेकर
प्रशासन अधिकारी
सदस्य

एम.के.कोळप
कायदा अधिकारी
सदस्य

मनोज माछरे
सहखजीनदार,कर्मचारी महासंघ
तथा सदस्य

प्रमोद जगताप
कामगार कल्याण अधिकारी
तथा सदस्य

आमोद कुंभोजकर
मुख्य लेखापरिक्षक
तथा सदस्य

जितेंद्र कोळंबे
मुख्य लेखाअधिकारी
तथा सदस्य

बबनराव झिंझुर्डे
अध्यक्ष, कर्मचारी महासंघ
तथा उपाध्यक्ष

डॉ. के. अनिल रॉय
आरोग्य वैद्यकिय अधिकारी
कार्याध्यक्ष

श्रावण हर्डीकर
आयुक्त
तथा अध्यक्ष